| MHKO050045582016 | नियमीत दिवाणी दावा क्र.३९६/२०१६<br>निशाणी क्र.६२ खाली आदेश<br>श्री. महादेव श्रावण कुरणे वगैरे<br>विरुध्द<br>श्री. रामा जक्काप्पा कुरणे वगैरे |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुत अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम २ व आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दाव्यात नमूद मयत वादी क्र.१ महादेव श्रावण कुरणे यांचे समोर मयत लिहणेसाठी व त्यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी अर्जात दिलेली दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी म्हणून प्रस्तुत अर्ज दिलेला आहे.

०२. वादी यांनी असे कथन केले की, वादी यांनी प्रस्तुतचा मनाईचा दावा दाखल केला आहे. यातील वादी क्र.१ महादेव श्रावण कुरणे हे दिनांक २६/१२/२०२२ रोजी मयत झाले आहेत. तरी वादी यांचे सदरात वादी क्र.१ यांचे नावा पुढे (मयत) असे शब्द घालून वादी यांचे वारसांची नांवे रेकॉर्डवर घेणेकरीता वादी यांनी सदरचा अर्ज दिला आहे. सबब, सदर अर्ज मंजूर करण्याची विनंती केली व दाव्यामध्ये दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी विनंती केली. वादींनी मयत वादी क्र.१ यांचे वारसांचा तपशिल प्रस्तुत अर्जात दिला आहे. त्याप्रमाणे मयत वादी क्र.१ चे वारस रेकॉर्डवर घेण्यात यावे अशी विनंती केली.

०३. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दिले व असे नमुद केले की, प्रस्तुत अर्जातील मजकुर पुर्णपणे चुकीचा असून मुदतीत नसलेने सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही. सबब, सदर अर्ज नामंजूर करण्याची तसेच हेवी कॉस्ट करण्याची विनंती केली.

०४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा कायम मनाई ताकीद मिळणेसाठी दाखल आहे. वादीच्या कथनाप्रमाणे मयत वादी क्र.१ महादेव श्रावण कुरणे हे दि.२६/१२/२०२२ रोजी मयत झाले असलेबाबत शपथेवर कथन केले आहे. प्रस्तुत अर्ज दि.१४/०३/२०२३ रोजी देण्यात आला आहे. त्यावरुन प्रस्तुत अर्ज मुदतीत असल्याचे स्पष्ट होते. प्रतिवादींनी जरी अर्जाला हरकत घेतली असली तरी मयताचे अर्जात नमुद वारसांशिवाय अन्य वारस असल्याबाबत कोणतीही हरकत नाही. दाव्याचे स्वरुप पाहता मयत वादी क्र.१ यांचे वारस दाव्यात सामील असणे आवश्यक दिसते. त्यावरुन दावा अंतिमरित्या व परिणामकारकरित्या निकाली निघण्यास मदत होणार आहे. त्यामुळे, प्रस्तुत अर्ज मंजूर

करणे न्यायाचे दिसते. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतो.

## आ दे श

**१.** निशाणी क्र.६२ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो व वादींनी मयत वादी क्र.१ चे वारसांबाबत दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्त दाव्याची प्रत मुदतीत दाखल करावी.

Digitally signed by
PATWE DATARAJ
GUNAJIRAO
Date: 2023.04.28
17:55:09 +0530

दि.२८/०४/२०२३

**(डॉ. डी.जी.पटवे)**

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, इचलकरंजी.